**CNR No. MHSI01-000419-2015**

<u>नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ७८/२०१५ मधील नि. १४, १५ व १६ खालील सामाईक आदेश.</u>

**(गुरुनाथ पाटकर – पुनर्वादी वि. सदाशिव मराळ वगैरे – उत्तरवादी)**

.........

१. पुनर्वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नि . १५ हा उत्तरवादी क्र . १ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. १४ हा उपशमितचा आदेश रद्द करणेकरीता आणि अर्ज नि. १६ हा सदरहू उत्तरवादीचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे अवलोकन केले व पुनर्वादींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. पुनर्वादींचे असे कथन आहे की, उत्तरवादी क्र. १– सदाशिव बाळकृष्ण मराळ यांचा मृत्यू दि. ०३/०४/२०१७ रोजी झाला. पुनर्वादी हे वयोवृध्द असून ते किडनीच्या विकाराने आजारी असून डायलेसिसवर असल्यामुळे, तसेच त्यांना सदरहू उत्तरवादीच्या वारसांची नांवे व पत्ते वेळीच उपलब्ध न झाल्यामुळे ते विहीत कालावधीत सदरहू उत्तरवादीचे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत व त्यामुळे त्यांना वारस अभिलेखावर आणण्यास विलंब झालेला आहे, असे कथन करुन त्यांनी सदरचा विलंब क्षमापित होवून सदरहू उत्तरवादीचे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जांकामी उत्तरवादी यांनी म्हणणे दिलेले नाही.

४. अभिलेखावरील उत्तरवादी क्र. १– सदाशिव बाळकृष्ण मराळ यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीवरुन त्यांचा मृत्यू दि. ०३/०४/२०१७ रोजी झाल्याचे स्पष्ट होत आहे. सदरहू उत्तरवादीच्या प्रस्तावित वारसांना नोटिसींची बजावणी झालेली आहे. जरी विलंबाचा कालावधी दिर्घ असला तरी प्रस्तुतचा पुनर्वाद हा सन २०१५ चा म्हणजेच जवळपास ८ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा असल्यामुळे, त्याचा लवकरात लवकर गुणदोषावर निर्णय होणे आवश्यक आहे व त्यामुळे न्यायहितार्थ पुनर्वादी यांना संधी देणे योग्य होणारे आहे. त्यामुळे सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान संभवत नाही , उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन प्रकरण गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. उत्तरवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमितचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२.	उत्तरवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३.	पुनर्वादींनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

(सं. जु. भारुका)

दिनांकः–२९/११/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.